T-1

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र १३२६/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी राज्यस्तरावर विशेष समिती गठित करण्याबाबत

19 MAR 2016
1122

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- न्यायाप्र २०१३/(२१३/१३)/विशि-१,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १० मार्च, २०१६.

**संदर्भ :-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. न्यायाप्र २०१३/(२१३/१३)/विशि-१. दि. २५ जुलै, २०१३.

प्रस्तावना :-

**दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते दिनांक ३ एप्रिल, २००० या कालावधीतील बिगर नेट / सेट अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राहय धरुन त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करणे तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय असलेली केंद्र शासनाच्या हिश्याची थकीत रक्कम एक रकमी अदा करणे, या प्रमुख मागण्यासाठी शिक्षक संघटनेने परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातलेला होता. सदर बहिष्काराच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक १३२६ / २०१२ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे, २०१३ रोजी अंतिम निर्णय दिला असून सदर आदेशातील परिच्छेद क्रमांक २४ मध्ये** शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावर तक्रार निवारण करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. अशा प्रकारची यंत्रणा शासन स्तरावर नसल्यामुळे शिक्षकांच्या तक्रारी अथवा वाद निर्माण होत आहेत. परिणामी शिक्षकांचे कामकाजावरील बहिष्कार/संप घडत आहेत. त्यामुळे शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारी इत्यादींचे निवारण करण्यासाठी दि.३१ जुलै, २०१३ पर्यंत राज्यस्तरावर तक्रार निवारण समिती गठित करण्यात यावी व या समितीच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षक संघटनेच्या मागण्या/समस्या/तक्रारी इत्यादीचा सखोल विचार करुन त्यावर अंतिम निर्णय घ्यावा, असे आदेश दिले होते. सदर आदेशास अनुसरुन दिनांक २५ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली होती.

116 सदरहू समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

२. त्यानुसार आता खालीलप्रमाणे समितीची पुनर्रचना करण्यात येत आहे. शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारी इत्यादींचे निवारण करण्यासाठी व या संबंधाने उच्च शिक्षणातील सर्व घटकांचेबाबत सर्वसमावेशक निर्णय घेण्यासाठी राज्य स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) | - | अध्यक्ष |
| २) मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) | - | उपाध्यक्ष |
| ३) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) | - | सदस्य |
| ४) अ.मु.स (सेवा/सा.प्र.वि.) | - | सदस्य |

५) प्रधान सचिव (वित्त) - सदस्य
६) प्रधान सचिव (विधी व न्याय) - सदस्य
७) उपसचिव (वि.शि.), उच्च व तंत्र शिक्षण- सदस्य सचिव
८) संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु सदस्य
९) संचालक, उच्च शिक्षण, म.रा.,पुणे - सदस्य

३. उपरोक्त नमूद बाबीव्यतिरिक्त दि.०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि.१० मे, २०१३ या कालावधीत परीक्षेच्या कामकाजावरील बहिष्कारात सहभागी झालेल्या शिक्षकांचे दि.०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि.१० मे, २०१३ या कालावधीचे वेतन बंद करण्याबाबत घेतलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग व शिक्षक संघटनांची भूमिका ऐकून घेऊन निर्णय घ्यावा.

४. सदर समितीच्या निर्णयावर प्रशासकीय विभागाचा निर्णय अंतिम राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सिध्दार्थ खरात )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (५ प्रती),

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** - ४१६ ००४. महाराष्ट्र
(संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीसी/ VID No 968 - दिनांक 3 MAY 2016

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

सदरचे पत्र/परिपत्रक/शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD-Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.